चर्चा :३

# उत्तर

माझ्या लेखाची दखल श्री. गळतगे व डॉ. खालकर यांचेसारख्या मान्यवर विद्वानांनी घेतलेली बघून आनंद वाटला.

श्री. गळतगे यांची प्रतिक्रिया म्हणजे तिरकस विनोद व तटस्थ विद्वता यांचे उत्तम उदाहरण जरी असले, तरी त्यांनी मी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे मात्र टाळले आहे. निदान माझे प्रश्न त्यांना मूर्खपणाचे वाटत असतील, तर त्यांनी तसे व्यवस्थितपणे सिद्ध करायला हवे.

माझ्या लेखाचे शेवटी मी समत्ववृत्तीविषयी जे लिहीले आहे, ते स्वानुभूतीतून लिहिलेले आहे, त्यासाठी तुकाराम-ज्ञानेश्वरांना 'वेठीला धरण्याची' (श्री. गळतगे यांच्या भाषेत) मला आवश्यकता नव्हती. हे संत 'ईश्वरवादी' होते, वा 'निरीश्वरवादी', या उहापोहापेक्षा त्यांची सृजनशीलता ही मला जास्त मूल्यवान वाटते. त्यांच्या अनुभूती आणि सृजनशीलता यातून जन्मलेल्या उक्ती प्रत्येकासच प्रेरणादायक ठरण्यासारख्या आहेत.

डॉ. खालकर यांना मी आपल्या लेखात गीता, गीतेचे तत्त्वज्ञान व भगवान श्रीकृष्णाविषयी ''नको त्या शंका-कुशंका'' उपस्थित केलेल्या आहेत, असे वाटते. मी उपस्थित केलेले प्रश्न त्यांना ''नको ते'' असे का वाटतात याचा त्यांनी स्वतःचे अंतरंगातच अवश्य शोध घ्यावा. असा प्रांजळ शोधच त्यांना समत्ववृत्तीकडे नेणारा जवळचा रस्ता असल्याचे आढळून येईल.

''आज जवळजवळ पाच हजार वर्षे श्रीमद्भगवद्गीता भारतीयांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करत आहे'', असे म्हणणारे श्री. खालकर असा चमत्कार गीतेतील कोणत्या ज्ञानामुळे घडला आहे ? दीपस्तंभाप्रमाणे असणारे श्लोक नेमके कोणते ? या प्रश्नांची उत्तरे मात्र देत नाहीत.

डॉ. खालकर सांगतात, त्याप्रमाणे एका युयुत्सु खेरीज कुणीही दुर्योधनाचा पक्ष सोडून पांडवांकडे आला नाही, यावरून त्या काळी दुर्योधनाचा पक्ष घेणाऱ्यांना त्याचीच भूमिका योग्य व न्याय्य वाटत असावी असे दिसते.

विश्वातील प्रत्येक घटना अनंत काळापासून चालत आलेल्या निरपवाद निसर्गनियमांप्रमाणेच घडत असता, पाच हजार वर्षांपूर्वी तेवढा 'देवांच्या प्रसादाने' वा 'यज्ञातून' अपत्यसंभव व्हावा, आणि आता मात्र तशी एकही घटना घडू नये, याचे आश्चर्य वाटते. अर्थात हे निसर्गनियम महाभारतकाळीसुद्धा सर्वांना ठाऊक असल्याने (अन्यथा 'नियोग' वगैरे पद्धती रुढ झाल्या नसत्या.) पांडवांचा जन्म देवतांच्या कृपेने झाला वगैरे गोष्टींवर विश्वास न बसणाऱ्यांनी दुर्योधनाचा पक्ष घेणे स्वाभाविकच वाटते.

'सत्यमेव जयते' याचा शाब्दिक अर्थ काहीही असला, तरी प्रत्यक्षात मात्र ज्याचा जय होतो, त्याचीच बाजू सत्याची होती, असे ठरवले जात असते. त्यामुळे भारतीय युद्धाचे शेवटी पांडवांचा विजय झाल्यामुळे एकंदरीत महाभारत हे पांडवांचे म्हणणेच खरे असून पांडव सद्‌गुणी व कौरव दुर्गुणी होते, अशा स्वरूपात रचले गेलेले दिसते. सत्ताधीशांचा उदोउदो करण्याचे कसब भारतीयांना रामायण काळापासूनच अवगत आहेसे दिसते.

हल्ली उपलब्ध असलेल्या गीतेतले सहा-सातशे श्लोक श्रीकृष्णाने प्रत्यक्ष रणभूमीवर उच्चारले होते, असे मानणाऱ्यांनी ते म्हणायला किती वेळ लागतो, हे प्रत्यक्ष प्रयोग करून बघावे. एवढा वेळ दुर्योधनाचा पक्ष स्वस्थ बसला होता काय ? अर्थात श्री. गळतगे मात्र गीताकारांनी त्यांना करायच्या असलेल्या उपदेशासाठी हा संदर्भ वा प्रसंग निवडून महाभारतात गीता समाविष्ट केल्याचे मान्य करतात. अशा रीतीने महाभारतात व गीतेत भर पडत जाऊन नंतर लबाड पंडेपुरोहितांनी त्यांच्या व्यवसायास आवश्यक अशा पाप-पुण्य, मुक्ती , पुनर्जन्म, ईश्वर, आत्मा-परमात्मा वगैरे काल्पनिक गोष्टींना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी, व याविषयी कुणी ''नको त्या'' शंका-कुशंका उपस्थित करू नयेत, म्हणून त्या 'भगवान् उवाच' म्हणून श्रीकृष्णाचे तोंडी घातलेल्या दिसतात. आज आपल्याला त्या गीतेत प्रत्यक्ष श्रीकृष्णाने सांगितलेले परमगुह्य तत्त्वज्ञान या स्वरूपात वाचायला मिळत असल्याने बहुतांश लोकांची फसगत होऊन ''ज्याअर्थी खुद्द भगवंतांनी तसे सांगितले आहे, त्याअर्थी ते खरेच असणार'' अशी सार्वत्रिक समजूत झालेली आढळते. या कारस्थानास आजवर भलेभलेही बळी पडत आल्याचे दिसतात. आता श्री. खालकर यांनी 'सर्वसामान्यांनाही सहज समजेल' असा जो 'निष्काम कर्मयोग' समजावून सांगितला आहे, त्यातून खरोखर काय समजते, हे बघूया.

**१) दररोजचे कर्म कर्तव्यभावनेतून करावे :** यावर प्रश्न असा, की आपले नेमके कर्तव्य कोणते, हे कुणी, कसे ठरवायचे ? उदाहरणार्थ कर्णाने दुर्योधनाचा मित्र वा आश्रित म्हणून त्याच्या बाजूने लढणे, किंवा कुंतीपुत्र म्हणून पांडवांकडून लढणे, यापैकी त्याचे योग्य कर्तव्य कोणते होते ? किंवा इंग्रजी अंमलात इंग्रजांची चाकरी करणाऱ्या भारतीयांचे कर्तव्य मालकाशी इमान राखून त्यांच्या हुकुमाची अंमलबजावणी करणे हे होते की, 'देशबांधवांशी' इमान राखून साहेबी हुकुमाचा अवमान ? याप्रकारे नेमके कर्तव्य कोणते, हेच ठरवता येत नसेल, तर मग 'कर्तव्यभावनेने' कर्म करायचे तरी कसे ?

**२) कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे केव्हाही चांगले :** एखाद्याचा खून करणे हे 'कर्म', करणे तर घरी स्वस्थ झोप काढणे, हे 'कर्म न करणे' असे म्हटल्यास झोप काढण्यापेक्षा खून करणे केव्हाही चांगले, असे श्री. खालकर यांना म्हणायचे आहे काय ? म्हणूनच श्रीकृष्णाने अर्जुनाला, "तू खुशाल गांडीव चालव" असे सांगितले की काय ? तसेच झोप काढणे वा स्वस्थपणे बसून राहणे हेही 'कर्म' आहे किंवा नाही ? जगातील अनेक समस्या या लोक भलतीच कर्मे करत असण्याचा परिणाम दिसतो, त्यापेक्षा ते स्वस्थ झोपा काढतील तरी बरे, असे दिसते.

**३) कर्म (वर्तन या अर्थाने) टाळणे शक्य नाही :** याचा अर्थ कर्म न करणे कधीच शक्य नाही, झोप म्हटली तरी तेही एक कर्मच झाले, असा असेल, तर 'कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे केव्हाही चांगले' हे विधान फोल ठरते.

**४) कर्म योग्य रीतीने करावे :** अमूकच रीत योग्य, हे कुणी, कसे ठरवायचे ? उदाहरणार्थ, एकादा रोग हटवण्यासाठी ॲलोपॅथी, होमियोपाथी, आयुर्वेद, युनानी, निसर्गोपचार, मानसोपचार, घरगुती इलाज यापासून मंत्र-तंत्र, अंगारा, ताईत अशा अनेक रीती प्रचलित आहेत. यातली 'योग्य रीत' कोणती? ती का ?

**५) त्यात कुठलीही कसर ठेऊ नये :** 'आता कुठलीही कसर राहिली नाही' हे कुणी, कसे ठरवायचे ? कारण बहुतेक कार्यात आणखी सुधारणेला नेहमीच वाव असलेला दिसतो. शिवाय सुनेने केलेल्या कामात सासूला, तर नोकराने केलेल्या कामात मालकाला हमखास काहीतरी कसर दिसूनच येत असते.

**६) सर्व शक्ती एकवटून काम करावे :** 'सर्व' म्हणजे काय ? संकटकाळी

मनुष्यात अकल्पनीय शक्तीचा तात्पुरता संचार होताना दिसतो, पण एरव्ही ती कुठून आणायची ? शिवाय यंत्रशक्ती, मानसिक शक्ती, संघशक्ती, इतरांची मदत वगैरे 'सर्व शक्ती' प्रत्येक कामात कशा एकवटायच्या ?

**७) आज ना उद्या चांगल्या कर्माचे फळ चांगले व वाईट कर्माचे फळ वाईट मिळते या विश्वासातून कर्म करावे.**

अमूक एक कर्म चांगले व अमूक एक वाईट, हे कुणी, कसे ठरवायचे ? वेगवेगळ्या काळी वेगवेगळ्या समाजात, परिस्थितीत एकच कर्म चांगले वा वाईट ठरवण्यात आलेले दिसते. त्यातील कोणते मत खरे मानायचे ? तेच का ? शिवाय निष्काम कर्म कसे करावे हे सांगताना, ही फळाची भानगड कशी उद्‌भवली ?

याच प्रकारे श्री. खालकर यांनी सांगितलेल्या इतर मुद्द्यांमधूनही 'निष्काम कर्म' या संकल्पनेवर काहीच प्रकाश पडत नाही. त्यापेक्षा मी माझ्या लेखात उल्लेख केलेला, लोकमानसात सर्वसाधारणपणे रूढ असलेला अर्थ [कोणतेही काम करताना त्यातून अपेक्षित असणारा लाभ आपल्याला मिळेलच, अशी खात्रीची आशा बाळगू नये. (कारण आपल्या इच्छेखेरीज व प्रयत्नांखेरीज नशीबावर ही बरेच काही अवलंबून असते) अशा वृत्तीने कर्म केल्यास अपेक्षाभंगाचे दुःख पदरी पडणार नाही, परंतु अपेक्षित लाभ झाला, तर त्यातून सुख मात्र लाभेल.] हा 'सर्व सामान्यांना सहज समजेल' असा, आणि ('परमेश्वरास कर्ता मानणे' ईश्वरेच्छेने सर्व घडते असे मानणे' 'कर्माचे फळ ईश्वरार्पण करणे' 'कुणाला तरी शरण जाणे' वगैरे कोणत्याही भानगडीत न पडता) आचरणात आणता येण्यासारखा आहे. यातून कदाचित मोक्षाचे डबोले मिळेल वा न मिळेल, पण निदान आयुष्यात दुःख, अपमान, मनस्ताप वगैरे कमीतकमी होतील.

घ. नं. ४१ / सेक्टर १९ **शरद सोवनी**
फरीदाबाद - १२१००२
हरियाणा.

[ सर्वसाधारणपणे गीतेविषयी प्रामाण्यबुद्धी बाळगून खूप लिखाण झाले आहे. पण तत्त्वज्ञानदृष्ट्या एखाद्या ग्रंथावर प्रामाण्यबुद्धीने लिखाण होणे जसे महत्त्वाचे आहे तसेच, किंवा कदाचित त्याहूनही जास्त, प्रामाण्यबुद्धी बाजूला

ठेवून, निर्भीड चिकित्सेच्या दृष्टीने लिखाण होणे महत्त्वाचे आहे. याच दृष्टिकोनातून परामर्श च्या मे १९९७ च्या अंकात श्री. शरद सोवनी यांचा 'गीता तत्त्वज्ञान काही प्रश्न' हा लेख आम्ही प्रसिद्ध केला होता. गीता-प्रामाण्य मानणाऱ्यांकडून त्यावर टीका होणे स्वाभाविक होते. पण गीता प्रामाण्य न मानणाऱ्यांकडून या लेखावर टीका टिप्पणी झाल्यास तिलाच प्राधान्याने प्रसिद्धी द्यावी अशी आमची कल्पना होती. पण तशी टीकाटिप्पणी न झाल्याने ती अपेक्षा पूर्ण झाली नाही. गीता समर्थकांकडूनच प्रतिक्रिया आल्या. त्यातल्या निवडक दोन प्रतिक्रिया येथे प्रसिद्ध केल्या आहेत. त्या प्रतिक्रियांना मूळ लेखकाने दिलेल्या उत्तराबरोबर सदर लेखावरील चर्चा 'परामर्श' पुरती थांबवीत आहोत -**संपादक** ]

# परामर्श प्रकाशने

## (पुस्तके)

१. **प्राचीन भारतीय साहित्यमीमांसा :** एक आकलन, लेखक डॉ. अशोक केळकर, (प्राचीन भारतीय नाट्यमीमांसा व साहित्यमीमांसा यांची पुनर्मांडणी करणारे पुस्तक) पृ. ७८, किं. रु. १०.

२. **श्रीभामतीप्रकाश :** (खंड १ व २), लेखक म. म. यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे, (ब्रह्मसूत्रशांकरभाष्यावरील श्रीवाचस्पतिमिश्रलिखित ''भामती'' टीकेच्या चतुःसूत्रीचे मराठी विवरण) पृष्ठे - प्रत्येक खंड सुमारे २५०, किंमत रु. ४०+४०=८०.

३. **धर्माचे समाजशास्त्र** : लेखक, डॉ. प्र. ज. जागीरदार, पृष्ठे ४४, किंमत रु, ५. (धर्मसंस्थेचे स्वरूप, त्याचे समाजातील स्थान इत्यादी प्रश्नांची समाजशास्त्रीय मीमांसा करणारे पुस्तक)

४. **पएसिकहाणयं**, मूळ कथेचा मराठी अनुवाद - डॉ. ज. र. जोशी, पृष्ठे ३५ किंमत रु. ६. (चार्वाकमताचा पएसि-राजा व जैनमताचा केसीमुनी यांच्यातील वादाची कथा - जैन अध्यासन फिरोदिया प्रकाशन)

५. **परमलघुमंजूषा :** (भाग १ व २) मूळ लेखक नागोजी भट्ट, मराठी अनुवाद, परिचय व टीपा-पं. वा. बा. भागवत, किंमत रु. १२+१२=२४. (भाषेच्या स्वरूपाची तात्त्विक भूमिका मांडणारा ग्रंथ- संस्कृत भाषा व व्याकरण यांच्या विशेष संदर्भात)

६. **भारतीय तर्कशास्त्राची रूपरेखा :** लेखक डॉ. सुरेंद्र बारलिंगे, डॉ. क्रांतिप्रभा पांडे, पृष्ठे २२४, किं रु. ४०. (प्राचीन भारतात विकसित झालेल्या तर्कशास्त्रीय विचारांची आधुनिक मांडणी व चिकित्सा करणारा मराठीतील एकमेव ग्रंथ)

७. **प्रो. जी. ई. मूर :** व्यक्ती व तत्त्वज्ञान, लेखक - वामन शिवदास बारलिंगे, पृष्ठे १०८ किं. रू २०. (प्रत्यक्षज्ञान, सामान्यज्ञान, सामान्यभाषा व नीती इत्यादी विषयांवरील मूर यांचे चिंतन प्रकट करणारे पुस्तक)

**संपर्क :** **संपादक, परामर्श,**
**तत्त्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ,**
**पुणे - ४११००७**

# परामर्श : विशेषांक सूची

(परामर्शच्या काही विशिष्ट विषयांना वाहिलेल्या विशेषांकांची सूची)

१) विटगेन्स्टाइन विशेषांक
( खंड ६ अंक १, मे १९८४ )

२) मार्क्स विशेषांक (प्रती संपल्या)
(खंड ५ अंक ४, फेब्रु. १९८४ )

३) मार्क्स आणि भारतीय विचारवंत (१)
(खंड ७ अंक १, मे १९८५)

४) मार्क्स आणि भारतीय विचारवंत (२)
(खंड ७ अंक ४, फेब्रु. १९८६)

५) विज्ञानाचे तत्त्वज्ञान (१)
(खंड ८ अंक २, ऑगस्ट १९८६)

६) विज्ञानाचे तत्त्वज्ञान (२)
( खंड ९ अंक १, मे १९८७)

७) सांख्यदर्शन विशेषांक
(खंड ९ अंक ३, नोव्हें. १९८७)

८) स्त्रीमुक्ती : समस्या आणि दिशा
(खंड ११ अंक १, मे १९८९)

९) ए. जे. एअर यांचे तत्त्वज्ञान
(खंड १२ अंक१, मे १९९०)

१०) तत्त्वचिंतक ज्ञानेश्वर
(खंड १३ अंक १, मे १९९१)

११) पर्यावरणविषयक तत्त्वज्ञान
(खंड १७ अंक ३, नोव्हें. १९८४ )

वरील सर्व विशेषांकांची किंमत प्रत्येकी २०/-रु.
टपालखर्च वेगळा

विशेषांकासाठी लिहा : संपादक परामर्श,
तत्त्वज्ञान विभाग,
पुणे विद्यापीठ,
पुणे ४११००७.

# या अंकातील लेखक

| | | |
|---|---|---|
| १) बी. आर. जोशी | : | विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे येथून तत्त्वज्ञान विभाग प्रमुख पदावरून निवृत्त. भारतीय राज्यघटना या विषयावर तत्त्वज्ञानात पीएच. डी. तसेच तदुत्तर संशोधन. राज्यघटनाविषयक तसेच समाजवादविषयक ग्रंथ प्रकाशित. |
| २) शरद् पाटील | : | सत्यशोधक मार्क्सवादी पक्षाचे संस्थापक, मार्क्स-फुले-आंबेडकर वादाचे प्रवर्तक, 'दासशूद्रांची गुलामगिरी' इत्यादी ग्रंथांचे लेखक. |
| ३) श्रीनिवास हेमाडे | : | संगमनेर महाविद्यालय, संगमनेर येथे तत्त्वज्ञान विभागप्रमुख. |
| ४) सौ. माणिक श्रीनंद ठकार | : | 'शैवपुराणातील अष्टांगयोग' या विषयावर पीएच. डी., योग ग्रंथसूचीचे लेखन, संस्कृत प्रगत संशोधन केंद्रात संशोधन सहायक. |
| ५) सौ. उषा अरविंद गडकरी | : | स्वातंत्र्य आणि नियतत्त्ववाद या विषयावर पीएच. डी. ( ग्रंथरूपाने प्रसिद्ध), 'जे. कृष्णमूर्तींचे शिक्षणविषयक विचार' इत्यादी पुस्तकांचे लेखन. धरमपेठ महाविद्यालय, नागपूर येथे तत्त्वज्ञान विभागप्रमुख. |
| ६) श्रीनिवास दीक्षित | : | राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथून तत्त्वज्ञान विभागप्रमुख म्हणून निवृत्त, 'इहवाद धर्म व नीति', 'भारतीय तत्त्वज्ञान' इत्यादी पुस्तकांचे लेखक. |
| ७) अद्वयानंद गळतगे | : | कादरगा (जि. बेळगाव) येथील नाडगे ज्युनिअर कॉलेजचे निवृत्त प्राचार्य. |
| ८) रा. शं. खालकर | : | 'महाभारतातील सामाजिक व राजकीय विचार' या विषयावर पीएच. डी., के. वि. पेंढरकर कॉलेज, डोंबिवली येथे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक. |
| ९) शरद गंगाधर सोवनी | : | एम. ए., जी. डी. आर्ट, चित्रकार. |